(फक्त कार्यालयीन उपयोगासाठी)

वस्तु व सेवाकर आयुक्तांचे कार्यालय
वस्तु व सेवाकर भवन, ८ वा मजला,
नविन इमारत, माझगांव, मुंबई ४०००१०.

# अंतर्गत परिपत्रक

क्र. राउआ.(प्रशिक्षण)/आस्था-१८/ विदेश प्रशिक्षण/२०१७-१८/ब- ५६४ मुंबई दि. ०५/०८/२०१७

विषय:- केंद्र शासनाच्या DOPT विभागामार्फत Short term & Long term विदेश प्रशिक्षणाबाबत.

०१ जुलै २०१७ पासून आपल्या विक्रीकर विभागात वस्तू व सेवाकर कायद्याची (GST) अंमलबजावणी प्रभावीपणे सुरु झालेली आहे. या अनुषंगाने प्राधान्यतत्वावर वस्तू व सेवाकर (GST) संदर्भातील कार्यालयीन कामे, प्रशिक्षणे इत्यादी अनेक कामे करावयाची आहेत.

केंद्र शासनामार्फत दरवर्षी Domestic Funding of Foreign Training (DFFT), Department of Personnel and Training यांच्याकडून होणाऱ्या Short term Training आणि Long term Training या विदेश प्रशिक्षणाकरीता आपल्या विभागातील वर्ग-१ चे अधिकारी विदेश प्रशिक्षणाकरीता Online/Offline अर्ज करीत असतात.

या अनुषंगाने असे आदेश देण्यात येत आहेत की, वस्तू व सेवाकर कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता **माहे मार्च २०१८ पर्यंत** विदेश प्रशिक्षणाकरीता या विभागातील अधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या कोणत्याही प्रशिक्षणाकरीता Online/Offline अर्ज सादर करू नये. कोणत्याही अधिकाऱ्यांने अर्ज केल्यास होणाऱ्या परिणामाची संपूर्ण जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची असेल.

तसेच विभागातील सर्व ईच्छूक अधिकाऱ्यांना प्रशिक्षणाची संधी मिळावी यासाठी ज्या अधिकाऱ्यांनी आतापर्यंत DOPT विभागामार्फत आयोजित केलेल्या विदेश प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे, त्यांनी प्रशिक्षण घेतलेल्या वर्षापासून पुढील ०४ वर्षे या प्रशिक्षणाकरीता अर्ज करु नये.

उपरोक्त मुद्दे विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी त्यांचे विभागातील कार्यालयातील सर्व अधिकाऱ्यांच्या निर्देशनास आणून, त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. या सूचनांचे उल्लंघन केल्यास सदर बाब गंभीर समजण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**राजीव जलोटा**
**राज्यकर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रत:-**

१) विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अपर पोलीस महासंचालक तथा मुख्य दक्षता अधिकारी.
३) सर्व अपर राज्यकर आयुक्त.
४) सर्व राज्यकर सहआयुक्त.
५) राज्यकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी.
६) स्थळप्रत.